International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.3 Jan – Feb 2022

# लष्करी परंपरेचा सातारा जिल्हा

**किरण गणपत कुंभार**

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयाची वेगळी ओळख आहे. सातारा जिल्हा हा 'शूर—विरांचा' जिल्हा आणि 'लष्करी जिल्हा' म्हणून ओळखला जातो. सातारा जिल्हयाला लष्करी परंपरा फार जुनी आहे. म्हणूनच आजही सातारा जिल्ह्यातील अनेक खेडेगावात वीरगळाचे अवशेष पहावयास मिळतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील घटक असलेला सातारा जिल्हा मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दातही अग्रेसर होता. १२ जानेवारी १७०८ रोजी स्वत: छत्रपती शाहू यांनी साताऱ्यात राज्याभिषेक केला आणि मराठा साम्राज्याची सुत्रे सातारा येथूनच संचालीत केली जाऊ लागली. मराठी साम्राज्याच्या अस्तानंतर ब्रिटीश काळामध्ये १८५७ च्या उठावात सातारा जिल्हाही अग्रेसर होता. ब्रिटीशांच्या वर्चस्वाखाली सातारा जिल्हयाने पहिल्या व दुसऱ्या विश्व युध्दात मित्र राष्ट्रांच्या बाजूने सहभाग घेतला. हीच परंपरा पुढे चालत आली त्यामुळे आज सातारा जिल्हयात जवळ जवळ २४७१२माजी सैनिक परिवार आहेत व आजही हजारो सैनिक सेवेत आहेत.

संस्कृति म्हणजे ज्ञान, श्रध्दा, कला, नीतिमत्ता, कायदा, प्रथा आणि समाजाचा सदस्य या नात्याने मनुष्याने प्राप्त केलेल्या इतर कोणत्याही क्षमता व सवयी, आचार विचार यांचा समावेश असणारी व्यवस्था होय. परंपरा म्हणजे एकापुढे एक किंवा एकामागे एक अशाक्रमाने अनेक सबंध्द गोष्टीची मालिका होय.[१]

**लष्करी परंपरा :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापने पूर्वी सातारा जिल्ह्यात फलटनचे निंबाळकर व जावलीचे मोरे हे मातब्बर सरदार घराण्यांची इतिहासात नोंद आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या पाडावानंतर सातारा जिल्हा काबिज केला आणि स्वराज्य सेवेत सातारा जिल्ह्यातील अनेक घराणी पुढे आली. त्यापैकी प्रतापराव गुजर आणि हंबीरराव मोहिते यांनी स्वराज्याचे सरसेनापती पद मिळविले होते. पुढे छ. शाहू महाराजांच्या कारकिर्दित सातारा मराठा राज्याची राजधानी असल्यामुळे सातारा जिल्ह्यातील लष्करी परंपरा खऱ्या अर्थाने सुरू झाली आणि याच

काळात नवीन सरदार घराण्यांचा उदय झाला. त्यामुळे सातारा जिल्ह्यातील अनेक खेडेगांवांत लष्करी परंपरा आणि संस्कृती रुजली आहे.

**ग्रामीण भागातील लष्करी परंपरा :**

सातारा जिल्ह्यातील अनेक खेडेगावांना लष्करी परंपरा लाभलेली आहे त्यापैकी काही खेडेगावाचा इतिहास पुढील प्रमाणे आहे.

**ल्हासूर्णे :**

ल्हासूर्णे येथील जवानांनी अगदी पहिल्या व दुसऱ्या महायुध्दात ही पराक्रम गाजविला आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेत गावामधील पाच सैनिक सहभागी झाले होते. १९७१ मध्ये भारत पाक युध्द झाल्यानंतर ग्रामस्थांनी गावात प्रजास्ताक दिन मोठया उत्साहात साजरा केला. गावातील आजी माजी सैनिक आपल्या लष्करी गणवेशासह सहभागी झाले होते. या प्रसंगातून प्रेरणा घेवून अनेक युवक लष्करात दाखल झाले.आपल्या मुलांनीही लष्करी सेवेत जावे अशीच पालकांची इच्छा असते. जवळपास घरटी एखादातरी युवक हा लष्करी कार्यात होता किंवा आहे.तर काही घरात दोन किंवा तीन व्यक्ती लष्करी सेवेत आहेत[२].

**आपशिंगे :**

आपशिंगे (मिलेट्री) गावालाही लष्करी परंपरा लाभलेली आहे. ब्रिटीश शासनाने गावांचे योगदान ओळखून पहिल्या महायुध्दात ब्रिटीशांकडून लढणाऱ्या ४६ जवानांच्या स्मृतीमध्ये गावात एक स्मारक उभे केले आहे. या गावातील सैनिकांनी भारताने लढलेल्या प्रत्येक युध्दात सहभाग घेतला होता. १९६२ मध्ये चीन विरुध्दच्या युध्दात चार सैनिक शहिद झाले. १९६५ मध्ये पाकिस्तान बरोबर युध्दात दोन सैनिक शहिद झाले. १९७१ च्या युध्दात एक सैनिक शहिद झाला. जवळपास प्रत्येक घरात एखादातरी युवक हा लष्करी कार्यात होता किंवा आहे रमेश निकम यांच्या कुटुंबातील १६ सदस्यांनी लष्करात सेवा केली आहे[३].

**महाबळेश्वरवाडी :**

या गावातील युवक अगदी ब्रिटिश काळा पासून लष्करात दाखल झाले होते. त्यापैकी मालोजी कोरड हे पहिल्या महायुध्दात लढले होते. धोंडीराम घोरपडे, मारूती घोरपडे ज्ञानू जगताप, कृष्णा काटकर, सुदाम पुळके इत्यादींनी दुसऱ्या महायुध्दात सहभाग घेतला होता. तसेच १९६२, १९६५, आणि १९७१ च्या युध्दातही या गावतील २६ जवानांनी सहभाग घेतला होता.[४] या व्यतिरिक्त, आंबवडे, शिरवळ, मर्ढे, खंडाळा अशा अनेक गावांना लष्करी परंपरा लाभलेली आहे.

**सातारा जिल्ह्यातील सेवा निवृत्त सैनिक :**

लष्करी परंपरा लाभलेल्या सातारा जिल्हयात सन २०१४ पर्यंत सेवानिवृत्त सैनिक यांची आकडेवारी खालिल टेबल क्र १मध्ये दर्शवली आहे.[५]

**टेबल क्र १**

| अ.क्र. | जिल्हा | भू दल | हवाई दल | नौदल | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | ६१५५ | २८७ | ३५४ | ६७९६ |
| २ | आकोला | १७८९ | ९० | ४५ | १९२४ |
| ३ | अमरावली | ३२२९ | १०७ | ३७ | ३३७३ |
| ४ | औरंगाबाद | ३५८६ | २१९ | १५४ | ३९४९ |
| ५ | बीड | २८४० | १२ | २० | २८७२ |
| ६ | भंडारा | ७३२ | १८ | २० | ७७० |
| ७ | बुलढाणा | ३८८३ | ५८ | २५ | ३९६६ |
| ८ | चंद्रपूर | ९६४ | ५२ | ३८ | १०५४ |
| ९ | धुळे | १२२० | ६२ | १७ | १२९९ |
| १० | गडचिरोली | ९६४ | ४ | ० | १०० |
| ११ | गोंदिया | ६५६ | १३ | ८ | ६७७ |
| १२ | हिंगोली | ४०१ | ४ | ५ | ४१० |
| १३ | जळगाव | २५१८ | १९९ | ६२ | २७६९ |
| १४ | जालना | १०४४ | २० | १६ | १०८० |
| १५ | कोल्हापूर | १०४२६ | ३४१ | ३६२ | १११२९ |
| १६ | लातूर | २९८९ | ३२ | १९ | ३०४० |
| १७ | मुंबई शहर | ४४१६ | ४९१ | ३९६९ | ८८६६ |
| १८ | मुंबई उपनगर | ५६१६ | १४८४ | २२८३ | ९३८३ |
| १९ | नंदुरबार | २०२ | १७ | ३ | २२२ |
| २० | नागपूर | ४०१३ | ३६७ | ८८६ | ५२६६ |
| २१ | नांदेड | १०४ | ३६ | १२ | १०५२ |
| २२ | उस्मानाबाद | ३२९३ | २९ | ३२ | ३३५४ |
| २३ | नाशिक | ४८१४ | १२६१ | २४८ | ६३२३ |
| २४ | परभणी | ६९१ | १५ | ८ | ७१४ |
| २५ | पुणे | १९६५६ | ३७५४ | १९१५ | २५३२५ |
| २६ | रायगड | २८८३ | १४७ | ३८६ | ३४१६ |
| २७ | रत्नागिरी | ३८०५ | ६६ | १०३ | ३९७४ |
| **२८** | **सातारा** | **१६६२४** | **३३८** | **४२१** | **१७३८३** |
| २९ | सांगली | १३२८२ | ३३९ | २८० | १३८०१ |
| ३० | सिंधुदुर्ग | ३१३१ | ६२ | ४२ | ३२३५ |
| ३१ | सोलापूर | ५७६६ | २१७ | १२१ | ६१०४ |
| ३२ | ठाणे | ५४८५ | १४५८ | २७७८ | ९७२१ |
| ३३ | वर्धा | ११३२ | ८० | ३० | ११४२ |
| ३४ | वाशीम | ६७९ | २० | ६ | ७०५ |
| ३५ | यवतमाळ | १०९५ | ६६ | २२ | ११८३ |
|  | एकूण | १३९९९५ | ११६५५ | १४७२७ | १६६३७७ |

सातारा जिल्ह्यातील सैनिकांनी मिळविलेली वीर पदके.[६]

टेबल क्र २

| अ.क्र. | सन्मानपदक | एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | विरचक्र | ५ |
| २ | शौर्यचक्र | ५ |
| ३ | किर्तीचक्र | १ |
| ४ | सेनापदक | १८ |
| ५ | वायूसेनापदक | १ |
| ६ | नवसेनापदक | १ |
| ७ | मिशनइंन्डीस्पॅच | १६ |
| ८ | आय.एस.डी.एम.<br>[Indian Service Distinguished Medal (ISDM)] | ७ |
| ९ | मिलीट्रीक्रॉस | ५ |
| १० | मिलीट्रीमेरीट | १३ |
| ११ | आय.ओ.एम.[Indian Order of Merit (IOM) ] | ५ |

**सातारा जिल्ह्यातील लष्करी परंपरेचा परिणाम :**

सातारा जिल्ह्यातील लष्करी परंपरेमुळे आज सातारा जिल्ह्यातील तरूणांमध्ये लष्करी सेवे विषयी आकर्षण आहे. सातारा जिल्ह्यातील अनेक खेडेगावातील स्वागत कमानी या शहीद सैनिकांच्या स्मरणार्थ उभारलेल्या आहेत. तसेच अनेक सैनिकांचे पुतळे आणि त्यांचा जीवनपट दर्शविणारे फलक लावलेले आहेत. कराड येथे १९७१ च्या भारत पाकिस्तान युध्दातील भारताच्या विजयाचा उत्सव 'विजय दिवस' म्हणून साजरा केला जातो[७]. त्यावेळी शौर्यपर व्याख्यानांचे आयोजन आणि आधुनिक शस्त्राचे प्रदर्शन आयोजित केले जाते.सातारा जिल्ह्यातील माजी सैनिक संघटनेच्या माध्यमातून अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. तरूण मुलांना लष्करी सेवेची संधी मिळावी म्हणून सातारा येथे भारतातील पहिले सैनिक स्कूल यशवंतराव चव्हाण संरक्षण मंत्री भारत सरकार यांच्या प्रयत्नातून साकार झाले. तसेच अनेक करियर ॲकॅडमीतून लष्करी सेवे बाबत मार्गदर्शन केले जाते.

**निष्कर्ष :**

परंपरा हा संस्कृतिचाच एक भाग आहे. म्हणून सातारा जिल्ह्यातील लष्करी परंपरा व त्याचे परिणाम याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. मराठा कालखंडात सुरू झालेली लष्करी परंपरा आणि सैनिकांच्या योगदानामुळे मध्ययुगात मराठयांनी स्वराज्याचे साम्रज्यात रूपांतर केले. मराठयांच्या इतिहासात पराक्रम गाजविणारी अनेक सरदार घराणीही सातारा जिल्ह्यातील आहेत. भारतातील प्रतिष्ठित सेवेपैकी एक असणाऱ्या लष्करी दलात सातारा जिल्ह्यातील तरूण स्वातंत्र्यपूर्व व नंतरच्या कालखंडात सहभागी झाला आणि आपल्या पराक्रमाचा ठसा उमटविला. सातारा जिल्ह्यातील ग्रामीण वातावरणात लष्करी संस्कृती रूजली आहे. त्यामुळेच अनेक खेडेगावात प्रदिर्घ अशी लष्करी परंपरा लाभलेली आहे. आणि आजही अनेक पिढया लष्करात सेवा बजावत आहेत. टेबल १ नुसार सातारा जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या संख्येत सातारा जिल्हा महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकावर आहे. या लष्करी परंपरेमुळे सातारा जिल्ह्याची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. सातारा जिल्ह्यातील सैनिकांनी युध्दभूमित गाजविलेल्या शौर्याबद्दल भारत सरकारने त्यांचा वीर पदक देवून सन्मान केला आहे. ते टेबल क्र २ वरून दिसते. कराड येथे दरवर्षी १६ डिसेंबरला‘विजय दिवस’ साजरा होत असल्यामुळे आधुनिक काळात एक नविन संस्कृति निर्माण होत आहे.

**संदर्भसुची :**


1. मराठीतील शब्दगत संकल्पनांचा कोश http://www.cfilt.iitb.ac.in
2. दैनिक सकाळ २७ जानेवारी २०१६. पृ.क्र.४
3. we call it a village of warriors, Edited By: Anurag Bende,Aniruddha Rajandekar, https://www.dnaindia.com/ access date 20/05/2021, Page No.1
4. दैनिक लोकमत २८ मार्च २०१५, पृ.क्र.२
5. सातारा जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील दप्तराती नोंद.
6. सातारा जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील दप्तराती नोंद.
7. https://maharashtratimes.indiatimes.com, access date 22/05/2021, Page No.2